# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ८९) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.२७ मार्च २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## अकोला पश्चिम विधानसभा पोटनिवडणूक रद्द; नागपूर खंडपीठाचे आदेश

अकोला दि.२६ (प्रतिनिधी)- अकोला पश्चिम विधानसभा पोटनिवडणूक रद्द करण्याचे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आदेश दिले आहे. न्या. अनिल किलोर आणि न्या. जवळकर यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले आहेत. अकोला पश्चिम विधानसभा निवडणुकीविरोधात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर निकाल देतांना खंडपीठाने पोटनिवडणुक रद्द करण्याचे आदेश दिले आहे. अकोल्यातील शिवमकुमार दुबे नावाच्या व्यक्तीने ही याचिका दाखल केली होती. त्यामुळे आता २६ एप्रिलला होणारी अकोला पश्चिम विधानसभा पोटनिवडणूक रद्द झाली आहे.

निवडणूक आयोगाकडून अकोला पश्चिम विधानसभा पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली होती. भाजप आमदार गोवर्धन शर्मा यांच्या निधनाने अकोला पश्चिम विधानसभेची जागा रिक्त झाल्याने लोकसभा निवडणुकीसोबतच अकोला पश्चिम विधानसभा पोटनिवडणूक देखील आयोगाने जाहीर केली होती. मात्र, याल विरोध होतांना पाहायला मिळाला. शेवटी प्रकरण न्यायालयात गेले. फक्त तीन महिन्याच्या कालावधीसाठी जनतेच्या पैशाचा अपव्यय का करता?, असा याचिकाकर्त्यांचा निवडणूक आयोगाला सवाल केला होता. दरम्यान, यावर निकाल देतांना न्यायालयाने निवडणूकच रद्द करण्याचे आदेश दिले आहे.

# नागपूरातून काँग्रेसचे विकास ठाकरे तर चंद्रपूर मधून भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांचा पहिला उमेदवारी अर्ज दाखल

नागपूर दि.२६ (प्रतिनिधी)- नागपूर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून काँग्रेसचे विकास ठाकरे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नितीन गडकरी यांच्या विरोधात विकास ठाकरे लढत देत आहेत. नागपूर काँग्रेसमधील नेत्यांमध्ये असलेले अंतर्गत मतभेद विसरून काँग्रेसचे सर्व नेते एकत्र आलेले या निमित्ताने दिसून आले. विकास ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार देखील उपस्थित होते. या निमित्त नागपूरमध्ये जोरदार शक्ती प्रदर्शन करत विकास ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



करण्यात आला.

नागपूर लोकसभा मतदारसंघात नितीन गडकरी हे भारतीय जनता पक्षाचे तगडे उमेदवार रिंगणात आहेत. त्यामुळे गडकरी यांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने कोणाला तिकीट दिले जाते याबाबत चर्चा रंगली होती. मात्र काँग्रेसने अंतर्गत गटबाजी बाजूला ठेवत विकास ठाकरे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले. त्यानुसार ठाकरे यांनी आज आपल्या उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मागील लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार नितीन गडकरी यांनी काँग्रेसचे तत्कालीन उमेदवार नाना पटोले यांचा पराभव केला होता. यावेळी नाना पटोले (पान ४ वर)

चंद्रपूर दि.२६ (प्रतिनिधी)- चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार विरुद्ध काँग्रेस उमेदवार प्रतिभा धानोरकर यांच्या लढत होणार आहे. सुधीर मुनगंटीवार हे आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती आहे.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून आज पर्यंत कधीही एवढ्या प्रचंड मतांनी उमेदवार निवडून आला नसेल, तेवढ्या मतांनी मुनगंटीवार निवडून येणार असल्याचा विश्वास या वेळी उपमुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या वेळी व्यक्त केला. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात यावेळी इतिहास रचला जाणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाने यावेळी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना लोकसभेच्या रिंगणात उतरवले आहे. वास्तविक सुधीर मुनगंटीवार हे या मतदारसंघासाठी इच्छुक नव्हते. मला केंद्रात नव्हे तर राज्यातच लोकांची कामे करायची आहे, असे त्यांनी आधीच सांगितले होते. मात्र, तरी देखील भाजपच्या पहिल्याच यादीत सुधीर मुनगंटीवार यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यामुळे विरोधकांनी देखील भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. (पान ४ वर)

## मोदींचे २०४७ च्या विकसित भारताचे ध्येय मूर्खपणाचे

**रघुराम राजन यांची टीका**

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसंस्था)- भारताचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात होत आहे, असा विश्वास निर्माण करून त्याची मोठ्या प्रमाणात जाहीरात करण्यात येत आहे. अशी जाहीरात करून भारत सर्वात मोठी चूक करत आहे. सर्वप्रथम भारताला महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करावे लागेल, त्यानंतरच भारत शाश्वत विकासाच्या दृष्टीने पुढे जाऊ शकतो, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी केले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर ज्या पक्षाचे सरकार येईल, त्यांना सर्वप्रथम आपल्या देशातील मनुष्यबळाचे शिक्षण आणि कौशल्य विकास यावर काम करावे लागेल. हे जर केले नाही, तर भारताला आपल्या तरूण लोकसंख्येचा काहीही लाभ होणार नाही, असेही ते म्हणाले.

ब्लुमबर्गने दिलेल्या वृत्तानुसार, रघुराम राजन म्हणाले की, भारताने सध्या अर्थव्यवस्थेच्या अवाजवी प्रसिद्धीवर जो विश्वास टाकलाय, तो चिंतेचा विषय आहे. ''अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी आपल्याला अनेक वर्ष कठोर परिश्रम करावे लागले होते. सध्या अर्थव्यवस्थेबद्दलची जी प्रसिद्धी केली जात आहे, ती राजकारण्यांकडून होत आहे. कारण त्यांना त्याची गरज आहे. पण इतर भारतीय नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवणे, ही सर्वात मोठी चूक होऊ शकते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ रोजी भारत विकसित राष्ट्र (पान ४ वर)

## मोदींना घरी पाठविणार, मगच झोप घेणार; उदयनिधी स्टॅलिन यांचे प्रत्युत्तर

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसंस्था)- तमिळनाडूचे मंत्री व द्रमुक पक्षाचे नेते उदयनिधी स्टॅलिन यांनी मंगळवारी (२६ मार्च) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पुन्हा एकदा टीका केली. पंतप्रधान मोदी यांनी इंडिया आघाडी आणि द्रविड मुन्नेत्र कळघमविरोधात केलेल्या एका वक्तव्यावर त्यांनी प्रत्युत्तर दिले. उदयनिधी स्टॅलिन म्हणाले की, आगामी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदी आणि भाजपाला घरी परत पाठविल्याशिवाय त्यांचा पक्ष झोपणार नाही.

तिरुवनमलाई जिल्ह्यातील प्रचारसभेला संबोधित करताना ते म्हणाले, ''पंतप्रधान मोदी म्हणतात द्रमुकला झोप येत नाही. होय, जोपर्यंत आम्ही तुम्हाला घरी पाठवीत नाही तोपर्यंत आमची झोप उडाली आहे. भाजपाला घरी परत पाठविल्याशिवाय आम्ही झोपणार नाही. २०१४ मध्ये गॅस सिलिंडर ४५० रुपये होता आणि आता तो १२०० रुपये झाला आहे. निवडणूक जवळ येत असल्याने पंतप्रधान मोदींनी नाटक सुरू केले आहे आणि १०० रुपये कमी केले आहेत. निवडणुकीनंतर ते पुन्हा सिलिंडरच्या किमती ५०० रुपयांनी वाढवतील,'' असे वृत्त 'एएनआय'ने दिले.

''काँग्रेस आणि त्यांच्या 'घमंडिया' आघाडीला (इंडिया आघाडी) या विकास प्रकल्पांचे उद्घाटन झाल्याने त्रास झाला आहे. या विकास प्रकल्पांमुळे त्यांची झोप उडाली आहे. विकासावर बोलण्याची ताकद काँग्रेसकडे नाही. जेव्हा मी विकास प्रकल्पांचे उद्घाटन करतो, तेव्हा ते त्याला 'चुनावी रणनीती' (निवडणूक रणनीती) म्हणतात. केवळ नकारात्मकता हेच काँग्रेसचे वैशिष्ट्य आहे,'' असे पंतप्रधानांनी ११ मार्चला विकास प्रकल्पाच्या उद्घाटन कार्यक्रमादरम्यान सांगितले होते.

## शिवाजीराव आढळराव पाटील अजित पवारांच्या राष्ट्रवादीत दाखल

पुणे दि.२६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते शिवाजी आढळराव पाटील यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश घेतला आहे. अखेर आढळराव पाटलांनी आपल्या हाती घड्याळ बांधलं आहे. ते शिरुर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार असतील. येत्या २८ मार्चला त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. आढळराव पाटील यांच्यासोबत शिवसेनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आपल्या हाती घड्याळ बांधलं आहे. मंचरच्या शिवगिरी मंगल कार्यालयात अजित पवार, दिलीप वळसे पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत शिवाजीराव आढळराव पाटलांचा पक्षप्रवेश झाला.

शिवाजी आढळरावांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाची फौज अजित पवारांच्या राष्ट्रवादीत दाखल झाली आहे. सगळ्यांनी अमोल कोल्हेंना पराभूत करण्यासाठी कंबर कसल्याचं दिसत आहे. शिरुरमध्ये आता अमोल कोल्हे विरुद्ध आढळराव पाटील अशी तगडी लढत बघायला मिळणार आहे. ही लढत अजित पवारांसाठी प्रतिष्ठेची असणार आहे. त्यामुळे अजित पवार या मतदारसंघात मोठी ताकद लावणार असल्याचं दिसत आहे.

## विजय शिवतारेंना शिस्तभंगाची नोटीस धाडणार; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा कटू निर्णय

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- बारामती लोकसभा मतदारसंघात पवार घराण्याविरोधात दंड थोपटून उभे राहिलेले विजय शिवतारे हे कोणत्याही परिस्थितीत माघार घ्यायला तयार नाहीत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही विजय शिवतारे यांना आपल्याला युतीधर्म पाळला पाहिजे, असा सल्ला दिला होता. मात्र, बारामती ही मला नियतीने दिलेली असाईनमेंट आहे, असे सांगत विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्याविरोधात उपसलेली तलवार म्यान करण्यास विजय शिवतारे यांनी नकार दिला होता. त्यामुळे आता निर्वाणीचा उपाय म्हणून शिंदे गटाकडून विजय शिवतारे यांना पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवला जाण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, शिवसेनेकडून विजय शिवतारे यांना लवकरच पक्षाच्या शिस्तीचा भंग केल्याप्रकरणी नोटीस पाठवली जाईल. यानंतरही विजय शिवतारे यांनी पक्षादेश मानला नाही तर त्यांना शिवसेनेकडून निरोपाचा नारळ दिला जाईल, असे सांगितले जात आहे. विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: विजय शिवतारे यांची मनधरणी केली होती. त्यानंतरही शिवतारे आपल्या भूमिकेवर ठाम राहिले होते. शिवतारे यांच्या या भूमिकेमुळे महायुतीत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. महायुती अस्तित्त्वात आली तेव्हा एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना स्थानिक पातळीवर एकमेकांशी जुळवून घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु, आता शिवतारे यांच्या आक्रमक वक्तव्यांमुळे महायुतीमध्ये मिठाचा खडा पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन एकनाथ शिंदे आणि शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी विजय शिवतारे यांच्यावर अखेर कारवाईचा बडगा उगारण्याचे ठरवल्याचे सांगितले जात आहे.

## भाजपा केजरीवालांच्या राजीनाम्यावर ठाम

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसंस्था)- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवुली संचालनालयाने अटक केली आहे. २८ मार्चपर्यंत ते ईडी कोठडीत राहणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्याने आपने निषेध नोंदवला आहे. केंद्र सरकारकडून सरकारी यंत्रणांचा गैरफायदा घेतला जात असल्याचं सांगून आपकडून विविध प्रकारचे निदर्शने सुरू आहेत. आज आपने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाला घेराव घातला आहे. तर, दुसरीकडे भाजपाने अरविंद केजरीवाल यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

अरविंद केजरीवाल यांना गेल्या आठवड्यात मद्य धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग चौकशीच्या संदर्भात ईडीने अटक केली होती. नैतिकतेच्या आधारावर केजरीवाल यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी भाजपची मागणी आहे. अरविंद केजरीवाल सध्या २८ मार्चपर्यंत ईडीच्या कोठडीत आहेत.

## अनिल देसाईचे पीए दिनेश बोभाटेंना ईडीचे समन्स

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांचे खासगी सचिव दिनेश बोभाटे यांच्याविरोधात ईडीने समन्स बजावले आहे. या आठवड्यात त्यांना चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बेहिशेबी मालमत्ताप्रकरणी यापूर्वी ईडीने दिनेश बोभाटे यांच्यावर मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला होता. मिळकतीपेक्षा ३६% बेहिशेबी मालमत्ता कमवल्याचा आरोप दिनेश बोभाटे यांच्यावर आहे. त्यामुळे ऐन निवडणुकांच्या तोंडावर अनिल देसाई यांच्याही अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

## राष्ट्रवादीचा पहिला उमेदवार जाहीर; सुनील तटकरे रायगडचे उमेदवार

पुणे दि.२६ (प्रतिनिधी)- आगामी लोकसभा निवडणूक अनुषंगाने राज्यात आम्ही एकत्रित चर्चा करून राज्यात ४८ जागांबाबत कोणी कोणती निवडणूक लढवणार आहोत, याबाबत ९९ टक्के काम झाले आहे. २८ मार्च रोजी मुंबईत एकत्रित सर्व जागा घोषित होतील. रायगड लोकसभा मतदारसंघात महायुती उमेदवार म्हणून सुनील तटकरे हे निवडणूक लढवणार आहेत. विविध घटक पक्ष एकत्रित येऊन आम्ही राज्यातील सर्व जागा लढवत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, धनंजय मुंडे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, संजय बनसोडे उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले की, शिवाजीराव आढळराव पाटील हे २० वर्षांपूर्वी आमच्या पक्षातून शिवसेनेत गेले होते, आज ते पुन्हा स्वगृही येत आहेत. त्यांना शिरूर लोकसभा निवडणूक लढवण्यास तिकीट देण्यात येईल, असे स्पष्ट संकेत देखील त्यांनी दिले. भाजपने गेल्या निवडणुकीत २३ तर शिवसेनेने १८ जागी विजय मिळवला होता. त्यामुळे या सर्वांचा विचार करुन जागा वाटप निश्चित केले जात असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कमी जागा मिळत आहे, असे दाखवून चुकीचा प्रचार केला जात असल्याचा दावाही त्यांनी केला.

भाजप आणि शिवसेना यांनी ज्या जागा जिंकल्या त्याची त्यांनी मागणी केली. आम्ही आम्हला (पान ४ वर)

## इस्लामिक कट्टरतावाद्यांकडून मॉस्कोत दहशतवादी हल्ला; पुतिन यांचे वक्तव्य

नवी दिल्ली दि.२६ (वृत्तसंस्था)- रशियाची राजधानी मॉस्कोमधील एका कॉन्सर्ट हॉलमध्ये शुक्रवारी (२२ मार्च) दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात १३९ जणांचा मृत्यू झाला असून १४५ पेक्षा जास्त जण जखमी झाले. इस्लामिक स्टेट ग्रुपने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. या हल्ल्याबाबत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पुतिन म्हणाले, 'कॉन्सर्ट हॉलवर करणारे हल्लेखोर इस्लामिक कट्टरतावादी होते.' शासकीय अधिकाऱ्यांबरोबरच्या बैठकीत पुतिन म्हणाले, इस्लामिक दहशतवाद्यांनी या हत्या केल्या आहेत. दहशतवाद्यांनी हा हल्ला केला आणि त्यानंतर ते युक्रेनमध्ये पळून जाण्याच्या प्रयत्नात होते. ते युक्रेनला का जात होते आणि तिथे त्यांची कोण वाट पाहत होतं ते शोधणं महत्त्वाचं आहे. इस्लामिक स्टेट – खोरासन या गटाने मॉस्कोतील हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. तसेच रॉयटर्सच्या वृत्तानुसार, अमेरिकेकडे याचे पुष्टीकरण करणारी गुप्त माहितीसुद्धा आहे. या हल्ल्याचं कारण अद्याप अस्पष्ट असलं तरी या प्रकरणी ११ दहशतवाद्यांना ताब्यात घेतले आहे. त्यामध्ये चार संशयित हल्लेखोरांचाही समावेश आहे.

## ज्योती मेटे बीड लोकसभा मतदारसंघातून लढवण्यावर ठाम; अपक्ष लढण्याचीही तयारी

बीड दि.२६ (प्रतिनिधी)- बीड लोकसभा मतदारसंघातून महाआघाडीच्या उमेदवार म्हणून ज्योती विनायकराव मेटे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. त्यातच त्यांनी त्यांच्या अप्पर सहनिबंधक पदाचा राजीनामा दिला असून आपण राजकारणात सक्रिय सहभागी होण्यासाठीच पदाचा राजीनामा दिला असल्याची माहिती त्यांनी आज कार्यकर्त्यांच्या बैठकीत दिली. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर त्या बीडमध्ये दाखल झाल्या असून त्यांनी स्व. विनायक मेटे यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आपण बीड लोकसभा मतदारसंघातून लढवण्यास इच्छुक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाने पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या वतीने या जागेवर ज्योती मेटे यांनी उमेदवारी द्यावी, असा आग्रह शरद पवार यांच्याकडे केला आहे. ज्योती मेटे यांनी शरद पवार यांची दोन वेळा या संदर्भात भेट देखील घेतली ओ. त्यामुळे बीड लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या ज्योती मेटे याच उमेदवार असतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, याबाबत शरद पवार यांनी त्यांचा निर्णय जाहीर केलेला नाही. मात्र, असे असले तरी ज्योती मेटे यांनी बीड लोकसभा मतदारसंघातून लढवण्याची तयारी सुरू केली आहे.

## राजू शेट्टी यांचा यू टर्न; महाविकास आघाडीचा पाठिंबा घेणार

हातकलंगले दि.२६ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्षाच्या विरोधात २०१५ पासून आम्ही काम करत आहोत, आम्ही भारतीय जनता पक्षासोबत जाणार नाही. मात्र, महाविकास आघाडीचे प्रमुख शरद पवार यांना आम्ही आघाडी सोडत असतांना एक पत्र लिहिले होते. त्याची साधी दखलही आघाडीने घेतली नव्हती. त्यामुळे महाविकास आघाडी सोबत देखील निवडणूक लढवायची नाही, असा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यामुळे या निवडणुकीत आम्ही स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार असल्याचे राजू शेट्टी यांनी जाहीर केले होते. मात्र, आता महाविकास आघाडी आपल्याला पाठिंबा देण्यास तयार असेल, तर मी देखील पाठिंबा घेण्यास तयार असल्याचे राजू शेट्टी यांनी सांगितले आहे. असे असले तरी आम्ही महाविकास आघाडीमध्ये स्वाभिमानी पक्षाचा समावेश करणार नसल्याचे राजू शेट्टी यांनी स्पष्ट केले आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने महाविकास आघाडी सोबत निवडणूक लढवावी असा प्रयत्न आघाडीच्या वतीने करण्यात आला होता. मात्र, राजू शेट्टी यांनी वेगळी भूमिका घेतली. ते जर वेगळी भूमिका घेणार असतील तर आम्हाला हातकलंगले लोकसभा मतदारसंघात महाआघाडीचा उमेदवार द्यावा लागेल, असे म्हणत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राजू शेट्टी यांच्या (पान ४ वर)

## 'मविआ'च्या विरोधात मराठा उमेदवार नको; जरांगेंची महाविकास आघाडीसोबत डील; अजय बारस्करांचा आरोप

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे यांच्यावर अजय बारस्कर यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठा आणि गंभीर आरोप केला आहे. आंतरवाली सराटीत झालेल्या बैठकीत प्रत्येक मतदारसंघात एक मराठा उमेदवार अपक्ष उभा करण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, यासाठी मनोज जरांगे यांची महाविकास आघाडीसोबत मोठी डील झाली असल्याचा आरोप अजय बारस्करांनी केला आहे. तसेच, महाविकास आघाडीचा उमेदवार अडचणीत येईल अशा ठिकाणी मराठा उमेदवार उभं करू नयेत अशी देखील डील झाल्याचा आरोप बारस्करांनी केला आहे. बारस्करांनी आज मुंबईत बोलवलेल्या पत्रकार परिषदेत हे आरोप केले आहे.

यावेळी बोलतांना अजय बारस्कर म्हणाले की, 'ओबीसी आणि मराठा समाजात भांडण लावली गेली. एकच मराठा अपक्ष उमेदवार उभा करण्याची पहिली डील झाली होती. आता मविआसोबत दुसरी डील सूरु आहे. मविआचा उमेदवार असेल तिथे उमेदवार उभा करणार नाही अशी दुसरी डील सुरू आहे. यांच्या आंदोलनाचा चार दोन लोकांना फायदा झाला आहे. आरक्षणाचा लढा हा आता राजकीय लढा झाला,' असल्याचे बारस्कर म्हणाले.

# मुख्यमंत्री केजरीवाल ईडीच्या पिंजऱ्यात

**तीन** वेळा दिल्लीचे मुख्यमंत्री झालेल्या अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने केलेल्या कारवाईनंतर तिहार जेलमध्ये जाण्याची पाळी यावी, हे मोठे दुर्दैव म्हटले पाहिजे. लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर केजरीवाल यांना अटक होऊन त्यांची रवानगी जेलमध्ये झाली, म्हणून इंडिया आघाडीतील पक्षांनी आदळ-आपट सुरू केली आहे. भाजपाने विरोधकांना संपविण्याचे कारस्थान रचले आहे, असा टाहो काँग्रेसपासून सर्व भाजपाविरोधी पक्ष फोडत आहेत. पण केजरीवाल हे ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही चौकशीला सामोरे गेले नाहीत, हे कोणी सांगत नाहीत. केजरीवाल हे मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांना कायदा उल्लंघन करण्याचे घटनेने चिलखत दिलेले नाही. दिल्लीच्या आम आदमी पक्षाच्या सरकारमधील तीन मंत्री अगोदरपासूनच जेलमध्ये आहेत. आता केजरीवाल यांची त्यात भर पडली आहे. ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत केजरीवाल यांना मोदी सरकारने जेलमध्ये पाठवले म्हणून त्यांना व त्यांच्या पक्षाला थोडी फार सहानुभूती मिळू शकेल, पण कायद्याच्या कचाट्यातून त्यांची सुटका कशी होऊ शकेल? दिल्ली सरकारने बनविलेल्या नवीन मद्य धोरणातून त्यांना व त्यांच्या पक्षाला जवळपास साडेतीनशे कोटी रुपये लाच म्हणून पैसे मिळाले, हा आरोप त्यांना न्यायालयात खोडून काढावा लागेल.

केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीला महाराष्ट्रातले नेतेही सामोरे गेले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक शरद पवार यांचा ईडीने नुसता नामोल्लेख करताच ते मुंबईतील ईडीच्या कार्यालयात त्यांच्यावर समन्स नसतानाही निघाले होते. महाआघाडी सरकारमध्ये गृहमंत्रीपदावर असलेले अनिल देशमुख यांनाही चौकशीच्या काळात कारावास भोगावा लागला होता. मंत्री छगन भुजबळ यांनाही जवळपास दोन वर्षे आर्थर रोड जेलमध्ये काढावी लागली होती. पण या सर्व नेत्यांनी दहा-दहा समन्स येण्याची वाट बघितली नव्हती किंवा चौकशीला जाण्यासाठी त्यांनी टाळाटाळ केली नव्हती. केजरीवाल यांना ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही ते चौकशीला गेले नाहीत. ईडीच्या विरोधात त्यांनी उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. आपल्या अटकेच्या कारवाईवर स्थगिती द्यावी, अशी न्यायालयाकडे मागणी केली होती, आपण ईडीकडे चौकशीला जाण्यास तयार आहोत. पण त्यांनी आपल्याला अटक होणार नाही, असे आश्वासन द्यावे अशी केजरीवाल यांनी कोर्टाकडे मागणी केली होती. मुळात अशी मागणी करणेच हास्यास्पद होते. उच्च न्यायालयाचे त्यांच्या मागण्या फेटाळून लावल्या आणि ईडीचे पथक त्यांच्या निवासस्थानी दरवाजात उभे राहिले. केजरीवाल हे निर्दोष आहेत की ईडीच्या म्हणण्याप्रमाणे मद्य घोटाळ्याचे प्रमुख सूत्रधार आहेत, हे न्यायालय ठरवेल. पण राज्याच्या मुख्यमंत्र्याला त्यांच्या घरी पोलीस आणि ईडीचे अधिकारी येऊन अटक करतात, यातून मुख्यमंत्रीपदाची बेईज्जती होते, हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

केजरीवाल हे दिल्लीमध्ये आम जनतेत लोकप्रिय आहेत. उच्च न्यायालयाने दुपारी अडीच वाजता त्यांचा अर्ज फेटाळून लावल्यावर ईडीची फौज त्यांच्या घरी सायंकाळी ७ वाजता हजर झाली. दोन तास चौकशी केल्यावर त्यांना अटक झाली. रात्री साडेअकरा वाजता त्यांना ईडीच्या मुख्यालयात आणण्यात आले. त्यानंतर रात्री १२ वाजता त्यांची वैद्यकीय तपासणी झाली व दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ मार्च रोजी त्यांना ईडीने न्यायालयासमोर उभे केले. मद्य धोरण घोटाळ्यात जे काही देव-घेवीचे व्यवहार झाले त्याची चौकशी होणे महत्त्वाचे आहे, असे नमूद करीत न्यायालयाने केजरीवाल यांना २८ मार्चपर्यंत ईडीची कोठडी सुनावली. मुख्यमंत्रीपदावर असलेल्या नेत्याला जेलमध्ये जावे लागले, अशी देशातील ही पहिलीच घटना आहे. केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता यांनी म्हटले आहे, 'सत्तेच्या अहंकारातून मोदी सरकारने त्यांना अटक करून जेलमध्ये पाठवले आहे, दिल्लीकर जनतेला केंद्र सरकारने दिलेला हा धोका आहे.' अटक झालेल्या केजरीवाल यांना राजकीय लाभ होईल, त्यांना जनतेची सहानुभूतीही मिळेल पण भाजपाला त्याची किंमत चुकवावी लागेल, असा इशारा शरद पवार यांनी दिला आहे. या अगोदर काँग्रेस पक्षाचे बँक खाते गोठविण्यात आले, आता मुख्यमंत्रीपदावर असलेल्या केजरीवाल यांना अटक झाली, विरोधी पक्षांचा आवाज दाबण्यासाठी ईडी व इन्कम टॅक्सचा वापर केला जातो आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. माजी न्या. संतोष हेगडे यांनी मात्र वेगळे मत मांडले आहे. दहा वर्षांपूर्वी 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' आंदोलनात न्या. हेगडे हे केजरीवाल यांच्याबरोबर सहभागी झाले होते. ते म्हणाले - 'जेव्हा कोणी सत्तेत असते, तेव्हा लालसेचे वर्चस्व निर्माण होते. आम आदमी पक्षाचे सरकार चांगले प्रशासन देईल, असे वाटले होते. पण सत्ता भ्रष्ट करते, हेच दिसले.'

शर्मिष्ठा मुखर्जी यांनी म्हटले आहे - 'केजरीवाल आपल्या कर्मामुळेच अटक झाले व जेलमध्ये गेले.' केजरीवाल यांनी दहा वर्षांपूर्वी काँग्रेसवर व त्यावेळच्या दिल्लीच्या मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्यावर भ्रष्टाचाराचे बेजबाबदार आरोप केले होते. शीला दीक्षित यांच्या विरोधात आपल्याकडे ट्रकभर पुरावे आहेत, असे ते म्हणत असत. प्रत्यक्षात तो ट्रक कधी आलाच नाहीष्ठ. आता मात्र केजरीवाल त्यांच्या कर्माची फळे भोगत आहेत. दिल्लीच्या उपमुख्यमंत्री अतिषी यांनी, तुम्ही एका केजरीवाल यांना अटक केलीत, पण लोकशाही वाचविण्यासाठी हजारो केजरीवाल दिल्लीच्या रस्त्यावर उतरतील, असा इशारा मोदी सरकारला दिला आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही आम्ही केजरीवाल यांच्या पाठीशी पहाडासारखे उभे आहेत, असे म्हटले आहे. नोकरशहा व मुख्यमंत्री राहिलेल्या केजरीवाल यांनी टाटा स्टीलमध्ये तीन वर्षे नोकरी केली आहे. सन २०१२ मध्ये त्यांनी पक्ष स्थापन केला. २०१३ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी हेमंत सोरेन यांनी झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाचा राज्यपालांकडे राजीनामा दिला व लगेचच ईडीने त्यांना अटक करून जेलमध्ये रवानगी केली.

सन २०१३ मध्ये केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत १५ वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या काँग्रेसच्या नेत्या शीला दीक्षित यांचा पराभव केला व इतिहास घडवला. त्यावेळी आपला बहुमत नव्हते, पण काँग्रेसने त्यांना बाहेरून पाठिंबा दिला व ते पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. सन २०१५ मध्ये आपचे ७० पैकी ६७ आमदार विजयी झाले व केजरीवाल दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. सन २०२० मध्ये आपचे ६२ आमदार जिंकून आले व केजरीवाल हे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली आपने विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व भाजपा दोन्ही राष्ट्रीय पक्षांना धूळ चारली. पण लोकसभा निवडणुकीत दिल्लीतून भाजपाचे सर्वच्या सर्व सात खासदार विजयी होत आले आहेत.

नवीन मद्य धोरणातून केजरीवाल यांनी व त्यांच्या पक्षाने हवालामार्फत ४५ कोटी रुपये चार मार्गांनी गोव्यात पाठवले, असे ईडीने न्यायालयापुढे सांगितले. गोव्यातील आपच्या उमेदवारांनीही त्याला दुजोरा दिलेला आहे. नवीन मद्य धोरणामुळे दिल्ली सरकारला २८०० कोटींचा तोटा झाला, दिल्ली सरकारने मद्य उद्योजक व ठेकेदारांना लाभ देण्यासाठी १३६ कोटींची लायसन्स फी माफ केली, त्याबदल्यात निधी मिळवला, असे आरोप ईडीने केले आहेत. मद्य धोरणाच्या व्यवहारात मनीष सिसोदिया, संजय सिंह यांचाही सहभाग होताच. तसेच विजय नायर हा मध्यस्थ होता व तो केजरीवाल यांचा उजवा हात म्हणून ओळखला जात होता. विजय नायर हा माजी मुख्यमंत्री सी. चंद्रशेखर राव यांची कविता यांच्यासाठीही काम करीत असे. कविता याही जेलमध्ये आहेत. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी ईडीच्या वतीने २८ पानांचा युक्तिवाद न्यायालयात सादर केला व त्यात त्यांनी दिल्ली सरकारच्या मद्य धोरण घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार असा केजरीवाल यांचा उल्लेख केला आहे.

समाजसेवक अण्णा हजारे यांच्या सन २०११ मधील दिल्लीतील रामलीला मैदानावरील उपोषणाने सारा देश हादरला होता. 'मै हूँ अण्णा'ने लक्षावधी युवक प्रेरित झाले होते. तेव्हाच्या मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारला अण्णांच्या आंदोलनाने मोठे हादरे दिले होते. केंद्रातील यूपीए सरकार घालविण्यात अण्णा यांच्या आंदोलनाचा मोठा वाटा होता. त्याच आंदोलनात अरविंद केजरीवाल हा एक प्रमुख चेहरा होता. किरण बेदी, मनीष सिसोदिया, संजय सिंह, कुमार विश्वास, योगेंद्र यादव, असे अनेक नेते या आंदोलनाने देशाच्या घराघरांत पोहोचले. केजरीवाल यांनी राजकारणात पडू नये, असे अण्णा हजारे यांनी अनेकदा स्पष्टपणे म्हटले होते. केजरीवाल यांना अटक झाल्यावर अण्णा हजारे म्हणतात - 'अरविंद केजरीवाल यांनी माझे कधीच ऐकले नाही. माझ्यासोबत काम करणारा व दारूच्या विरोधात आवाज उठवणारा अरविंद, दिल्ली सरकारचे मद्य विक्रीविषयक धोरण ठरवतो, याचे मला वाईट वाटले. त्याला झालेली अटक ही त्याच्या चुकीमुळे झाली आहे.' आता काय होईल ते सरकार बघेलष्ठ. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून उदयाला आलेले केजरीवाल ईडीच्या पिंजऱ्यात सापडले आहेत.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# केली आहे देवे कृपा। तरिच आलो मानवरूपा।

**द**रवर्षी आपण नवीन वर्षाच्या स्वागतासह नवनवीन संकल्प सोडतो. माणूस म्हणून जगताना, आपण कित्येक गोष्टींकडे दुर्लक्ष करतो का? असा प्रश्न आपल्यालाच अनेकदा पडतो. 'मनुष्य जन्म' एकदाच मिळतो, असा आपल्या भारतीय संस्कृतीत पूर्वापार समज असताना, माणूस म्हणून जगताना आदर्श जीवन कसं जगता येईल, त्यासाठी नेमकं काय केलं पाहिजे, कोणकोणत्या कृतींचे चांगले आणि वाईट परिणाम आपल्या आयुष्यावर होतात, याचा साकल्यानं विचार करण्याची क्षमता स्वत:मध्ये निर्माण करणं, हे खरं 'मनुष्य जन्मा'चं सार्थक आहे. दैनंदिन जीवनशैलीत आलेलं आणि येणारी वर्ष घालवत आपलं आयुष्य समृद्ध होत नसतं; तर आपापल्या क्षमतेनुसार समाजोपयोगी कार्य करण्यासाठी प्रयत्नशील राहिल्याने आयुष्याचं खरं सार्थक होतं.

तुकाराम महाराजांच्या मते, या भूतलावर कोणालाही सहजासहजी मनुष्य देह मिळत नाही. मनुष्य देह मिळवण्यासाठी देवगणांनाही तिष्ठत बसावं लागतं, मग हा मनुष्य देह भगवंताने आपल्यालाच का दिला? यामागचं नेमकं कारण आपण लक्षात घेतलं पाहिजे. मनुष्य जन्म मिळून देखील अनेकांना कसं जगायला हवं, हे कळत नाही. सजीव म्हणून विविध योनीत जन्माला आलेल्यांच्या अनेक इच्छा-आकांक्षा असतात, पण त्यांना 'मनुष्य देह' हे माध्यम मिळत नाही. याच अर्थाचा अभंग संत तुकडोजी महाराज लिहितात,



**। केली आहे देवे कृपा।**
**तरिच आलो मानवरूपा।**
**। उपकार सांगो**
**किती?। मी तो दिन**
**अल्पमती।**
**। घडे भक्ती या देहाने।**
**हे तो देवाचेचि देणे।**
**। तुकडय़ादास सदा**
**दीन। पुरवी आस नारायण।**

ते म्हणतात, हे प्रभो, तुझ्या कृपेशिवाय मनुष्य देहाची प्राप्ती होऊच शकत नाही. तुझी कृपा आमच्यावर झाली आहे, म्हणूनच आम्हाला मानवरूप मिळाले आहे. तुझे आमच्यावर किती किती उपकार आहेत, हे सांगण्यासाठी आमची मतीही कमी पडेल. जे काही पाप-पुण्य या देहाने घडते, ते तुलाच अर्पण करतो. माझ्याकडून घडणारी चांगली भक्तीही तुझीच देण आहे. त्यामुळे या मनुष्यदेहात माझं असं काहीच नाही. माझ्या हातून सदैव तुझी भक्ती घडावी, हीच माझी तुझ्याकडे मागणी आहे. तुकडोजी महाराज म्हणतात की, मनुष्य देह मिळणे म्हणजे भगवंताची कृपा होणे होय.

ही कृपा जर आपल्यावर झाली आहे, मग आपण छळ, द्वेष, कारस्थानं, पापं का करतो? आपल्याकडून पापांपेक्षा अधिक पुण्यकर्म का होत नाही? मनुष्य देह मिळताना जे कष्ट होतात, त्या कष्टातून सोडवणूक करण्यासाठी माणूस भगवंताची प्रार्थना करतो. हे भगवंता, 'मी भूतलावर गेल्यावर फक्त तुझीच भक्ती करेन, पण मला या गर्भवासातून मुक्ती दे. मला मनुष्यरूप दे म्हणजे माझ्या मुखातून मला तुझे नाव घेता येईल', अशी आश्वासनं जीव गर्भवासात असताना देतो. परंतु जीवाची मुक्तता होऊन तो मातेच्या उदरातून बाहेर येतो, पहिल्यांदा रडतो. या रडण्यातून त्या बालकांचा आणि भगवंताचा संवाद सुरू असतो.

भगवंत विचारतात, 'तू गर्भवासात असताना जे बोलला होतास ते आता पूर्ण करणार आहेस ना?' त्यावेळी तो बालक रडतानाच देवाला विचारतो, 'असे मी केव्हा बोललो होतो.' बाळ रडताना, 'कोहंऽऽऽ.., कोहंऽऽऽ..' असा आवाज येतो. सगळ्यांना बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकून आनंद होतो. पण जसा गर्भवास संपतो तसा बालक देवाला दिलेली वचने विसरतो म्हणजे देवालाच विचारतो. मनुष्य देह मिळाल्यावर मनुष्याला कधीच संतोष, समाधान मिळत नाही. जन्मभर मनुष्य सुखाच्या शोधात धडपडत असतो, पण त्याला सुख प्राप्त होत नाही. त्यामुळे तुकडोजी महाराज म्हणतात की, 'हे लोकहो, तुम्ही जरी देवाला दिलेलं वचन विसरला असाल तर तुम्हाला फक्त मरणातच सुख मिळणार आहे.'

कारण जन्म आणि मरण हे दोनच क्षण असे आहेत, ज्यावेळी मनुष्य स्वत:साठी जगतो. मनुष्याचा जन्म होताच त्याचा इतरांसाठी जगण्याचा प्रवास सुरू झाला, असं म्हणायला हरकत नाही. कारण जन्म झाला की, सर्वप्रथम त्या जीवाला आई-वडील हे नातं लाभतं. आईने घास भरवला, म्हणून आईसाठीच जेवू लागला. त्यांच्यासाठी शाळेत जाऊ लागला. तरुणवयात येताच हळूहळू जबाबदारीची जाणीव व्हायला लागते. लग्नानंतर बायका-पोरं कुटुंबासाठी कर्तव्य बजावायची असतात आणि जेव्हा गलीतगात्र अवस्था येते, तेव्हा तो देवाचा धावा करू लागतो. देवाने ही सुटका केली नाही, तेव्हा तो त्याचा अमूल्य श्वास सोडतो. म्हणजे या भूतलावर येऊन तो फक्त दुसऱ्यासाठीच जगला, स्वत:साठी एक क्षण देखील जगला नाही. त्याच अर्थाचा अभंग महाराज लिहितात,

**। प्राणी रडे जन्म घेता। म्हणे**
**नये मी मागुता।**
**। नको नको गर्भवास। दु:ख**
**होतसे जीवास।**
**। येता उदरा बाहेरी। 'कोहं'**
**शब्द ते उच्चारी।**
**। तुकडय़ा म्हणे मरणी हास।**
**तरिच जीवा ये संतोष।**

आपण नेहमी दुसऱ्यासाठी जगलो खरं, पण त्यातूनच आपण त्या परमात्म्याचं नाव घेऊ शकलो नाही. यापेक्षा मोठं दु:ख नाही. आपण या मोहमायारूपी संसारात जन्म घेतला खरा, पण वासनेचा नाश करता आला नाही, तर या देहाचे सार्थकच झालं नाही. महाराज म्हणतात, तुम्हाला हा जन्म मिळाला आहे. त्याचं सार्थक केलं तरच पुढचा जन्म चांगला मिळेल; अथवा मेल्यावर लोकही तुम्हाला विचारणार नाहीत. मनुष्य जन्म घेतल्यावर कधी ना कधी आपल्याला हा देह सोडून परलोकांचं गमन करायचं आहे. पण परलोक गमन करतानाच आपल्या मरणाचं लोकांना दु:ख वाटले पाहिजे, अशी आपली कृत्यं असावी.

**। जन्मलासी तेव्हा सर्वही हासती।**
**प्रसाद वाटती दारोदारी।**
**। रडसी तू तेव्हा 'कोहं' म्हणूनीया।**
**गर्भवासाचिया दुखे भारी।**
**। आता ऐसे करी आलिया संसारी।**
**ऋणा नाश करी वासनेच्या।**
**। मरणी हासणे मरणा पाहणे। साधून**
**घे, जेणे साध्य होय।**
**। तुकडय़ादास म्हणे**
**परलोक-गमना। दु:ख वाटे**
**जना ऐसे करी।**

मनुष्य देह मिळवण्यासाठी मनुष्य प्राण्याला लक्ष चौऱ्याऐंशी योनीमधून जावं लागतं. मनुष्य जन्म घ्यायचा असेल तर प्रत्येक योनीमध्ये कोटी कोटी फेरे घ्यावे लागतात, त्यानंतरच मनुष्य जन्म मिळतो, या अर्थाचा तुकाराम महाराज यांचा अभंग,

। एक एक योनी। कोटी
कोटी फेरा।
। मनुष्यदेह वारा। मग
लागे।

जर मनुष्य देह मिळवण्यासाठी आपल्याला इतके सायास करावे लागतात. मग आपण या देहाचं सार्थक का करत नाही? याचं आत्मपरीक्षण करणं गरजेचं आहे. मनुष्य देहाइतकं चांगलं काही नाही आणि वाईटही काही नाही. मनुष्यला देह मिळताना तो देवरूपी अंशाचा भाग म्हणूनच मिळाला होता. पण आपण मनुष्याने समाजाबरोबर आपल्या देहातील देवाचा कधी दानव केला, हे आपलं आपल्यालाही समजलं नाही. त्यामुळे विषय वासनेपासून मुक्त राहून देवाजवळ म्हणजे त्याची भक्ती करण्याचा प्रयत्न करा.

। दुर्लभ मनुष्य जन्म या जगती।
सुभाग्याच्या अंती प्राप्त होय।
। फिरूनीया आला कोटय़वधी फेरा।
जीव हा सामोरा मानव झाला।
। कोणी जो धाडील तया विषयवाटा।
त्यावीण करंटा कोण आहे?।
। तुकडय़ादास म्हणे शहाणे व्हा
आधी। तोडा ही उपाधी संसाराची।

आपल्याला मनुष्य जन्म का मिळाला, हे आपण पाहिलं. पण याच मनुष्य देहात सत्य सुख काय आहे, हे आपल्याला माहीत नाही. सत्य सुख शोधण्यास आपलं अवघं आयुष्य सरतं, परंतु ते आपल्याला मिळत नाही. त्यामुळे आपण मनुष्य देह मिळूनसुद्धा देहाचे सार्थक करू शकत नाही.

## मनुष्य देहातील सत्य सुखाचा शोध

मनुष्य म्हणून जगताना आपण विविध शास्त्र, पुराणांचा आधार घेत असतो. त्याचबरोबर विषय वासनेने आपण ग्रासलेले असतो. मोहमायेच्या पाशात आपण अडकलेलो असतो. मग आपल्याला सत्य सुख मिळणार कसं? त्यासाठी काय करावे लागेल? त्यामुळे आपण मनुष्य म्हणून संतांच्या चरणी लीन व्हायला हवं. त्याचबरोबर चांगली संगत करायला हवी. मनाला भरकटवू न देता त्याला नामस्मरणाची ओढ लावली पाहिजे. उगाच निंदानालस्ती करण्यापेक्षा प्रभूचे नाव घेतले पाहिजे. जे काही आपलं नाही ते मिळवण्यासाठी कधीच अट्टाहास करता कामा नये. जर आपण न मिळणाऱ्या वस्तूसाठी अट्टाहास करत बसलो तर आपल्याला कधीच शांती-सुख मिळणार नाही, त्यामुळे महाराज म्हणतात, संतांना शरण जा म्हणजे तुम्हाला सत्य सुख मिळेल. त्याच अर्थाचा अभंग महाराज लिहितात,

**। ऐकली पुराणे नाना शास्त्रांतरे।**
**मन हे विकारे स्थीर नाही।**
**। जगाची ऐकली भलीबुरी निंदा।**
**परि त्या गोंविदा भेटी नाही।**
**। साधनांच्या संगे देह कष्टविले।**
**तरि ना पावले शांति-सुख।**
**। तुकडय़ादास म्हणे सुखा तै**
**लाभलो। संतापायी**
**झालो लीन जेव्हा।**

भावार्थ, मी देवाला मिळवण्यासाठी काय नाही केलं ते विचारा. मी उपवास केले. अन्नात मिठाचे सेवन केले नाही. देव मिळवण्यासाठी देवाला मिष्टान्नाचा नैवेद्य दाखवला. कीर्तनात, प्रवचनात ऐकून लोकांना भोजन वाढले. पण मला काही देव सापडला नाही. मग मी गुरूंची शरणागती पत्करली. त्यांनी मला हे सायास करू नकोस, असं सांगितलं आणि नाम हेच तारक आहे. त्याचा जप कर, असे सांगितले.

**। बहु भोजनादि करोनि**
**पाहिले। मिष्टान्न भक्षिले**
**सर्वकाळ।**
**। फिके अन्न केले मीठ ना**
**घातले। उकडोनि भले जेवलो मी।**
**। तिखट मिठाचा सोडियला**
**स्वाद। तरि हा गोंविद तृप्ती ना**
**दे।**
**। तुकडय़ादास म्हणे तृप्ती**
**आहे नामी। घोकता आरामी बहु**
**झालो।**

याच अर्थाचा अभंग संत तुकाराम महाराज ही लिहितात. ते सांगतात, माझ्या मनातील भाव माझ्या गुरूंनी जाणून घेतला आहे. त्यांनी जो आता उपाय सांगितला आहे. तो इतका सोपा आहे की, ज्यामुळे माझ्या नित्यनेमात काहीच फरक पडत नाही किंवा माझं एखादं काम ही गुंतून राहत नाही. या मार्गामुळे साधू संत तरले आहेत. लहान मोठय़ांना ज्यांना ज्याप्रकारे नाव घेता येईल त्यांनी त्याप्रकारे नाव घेतले तरी ही संसार सागरात तरला जाऊ शकतो. या संतांनी या मोहमायेतून तारणाऱ्या पांडुरंगाचे नाव मला सुचवले आहे. ज्यामुळे मला यातून सहजगत्या मुक्ती मिळू शकते.

**। माझिये मनीचा जाणोनिया**
**भाव। तो करी उपाव गुरूराव।**
**। आवडीचा मंत्र सांगितला सोपा।**
**जेणे नोहे गुंफा कोठे काही।**
**। जाणत्या नेणत्या ज्या जैसी**
**आवडी। उतार सांगडी तापे पेटे।**
**। तुका म्हणे संती दाखविला**
**तारू। कृपेचा सागरू पांडुरंग।**

## सुख कशात आहे?

महाराज म्हणतात, भौतिक सुखं वगळता नेमकं सुख म्हणजे काय? सुख मिळवण्यासाठी काय केलं पाहिजे? सुखाची व्याख्या काय करता येईल? याचा शोध घेण्याचा प्रयत्न.

**पलंगी बैसोनि गादिया लोटता।**
**अंगासी लावता सुगंधादी।**
**। तरि सुख नोहे मन हे चंचल।**
**भोगताना हाल धनाचिये।**
**। सुख नाही व्यवहारी नाचता।**
**असत्य बोलता शांति नाही।**
**। तुकडय़ादास म्हणे सुख आहे**
**त्यागी। ज्ञानाचिया रंगी रंगोनिया।**

वरील अभंगात महाराज म्हणतात की, माणूस म्हणून जगताना प्रत्येकालाच सुखाची निकड असते. परमार्थापेक्षा प्रपंचाची ओढ असते. तो विषय वासनेत भरकटलेला असतो. पण जोवर मनुष्याचे मन स्थिर होत नाही तोवर मनुष्याला कोणत्याच प्रकारचे सुख उपभोगता येत नाही. मनाला सर्व इंद्रियांमध्ये श्रेष्ठ मानलं गेलं आहे. मनाची चंचलता थांबली तर मनुष्य देवरूपाला पोहोचतो. त्याचप्रकारे मनाला विषय वासनेपासून दूर ठेवले तर मनुष्याला संत देखील बनता येऊ शकते. पण आजकाल माणसाला माणूस म्हणून जगायला फुरसत नाही.

माणूस म्हणून जगताना आपण माणुसकी विसरत चाललो आहोत. दगडात देव शोधत बसलो आहोत. खरं तर 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा', हे वाक्य आपण विसरलो आहोत. महाराज म्हणतात, तुम्ही महालात राहिलात आणि पलंगावर झोपलात म्हणजे तुम्ही सुखी झालात काय? सुख त्यात आहे का? तुम्ही सुगंधादी चंदन अंगाला लावले म्हणजे तुम्ही सुखी झालात का? जोपर्यंत मनाची चंचलता थांबत नाही तोवर आपण कितीही श्रीमंत असून आपल्याला सुख मिळणारच नाही. आपण एखाद्याला लुबाडून कधीच श्रीमंत होऊ शकत नाही. काही व्यक्ती लोकांना लुबाडून आपण सर्वसुखी आहोत, असा आव आणतात. पण ते लोकांचे लुबाडले धन कधीच त्या व्यक्तीला सुखी करू शकत नाही त्यामुळे आपण स्वकष्ट करूनच धन कमावले पाहिजे. नाहीतर ते धन उपभोगताना देखील मनुष्याचे मन विचलीत होऊ शकते. सुख म्हणजे धन आहे का? सुख आणि धनाची तुलना कधीच होऊ शकत नाही. कारण सेवेत सुख आहे आणि धनात मोह आहे. सुख सहजासहजी मिळत नाही पण धन मिळवण्यास म्हणावे तितके कष्ट देखील लागत नाहीत. त्यामुळे धनाची आणि सुखाची तुलना होऊच शकत नाही.

मनात चंचलता आणि धनाबद्दल हव्यास असेल तर त्या व्यक्तीला धन मिळवूनसुद्धा त्याचा उपभोग घेता येत नाही. महाराज म्हणतात, जर आपण व्यवहारात पुढारपणा केला तर त्यात आपले सुख आहे का? तर नाही. कारण व्यवहारी जीवनात धनाला महत्त्व आहे. ज्याच्या जवळ धन आहे, त्याचीच चलती या जगात आहे. कारण धन नसेल तर मान मिळत नाही. त्यामुळे या जगात जो धनवान आहे. त्याचीच सर्व काम, होताना दिसतात. व्यवहारात जरी धनाला महत्त्व असले तरीही परमार्थात त्याचा काही उपयोग नाही. एखाद दुसऱ्या दिवशी पुढारपणा करून लोक तुम्हाला जुमानणारच नाहीत. ज्यादिवशी तुम्ही पुढारपणा कराल त्याचदिवशी तुम्हाला मान मिळाल्याचे सुख मिळेल. पण दुसऱ्यादिवशी तुम्हाला कोणीही विचारणार नाही. या जगात धनवंताला कशा प्रकारची किंमत आहे हे संत तुकाराम महाराज एका अभंगात सांगतात,

**। धनवंता लागी। सर्व**
**मान्यता आहे जगी।**
**। माता पिता बंधुजन। सर्व**
**मानिती वचन।**

या अभंगात महाराजांनी धनवंताला या जगात काय किंमत आहे, याचं उदाहरण दिलं आहे. संत तुकडोजी महाराज याच्यावर लिहिताना म्हणतात की, नुसते एक दिवस दान-धर्म करून का कोणी श्रीमंत होते. त्यामुळे त्या पुढारपणात देखील सुख नाही असं महाराज सांगतात. ते म्हणतात की, तुम्ही एखादं चुकीचं काम केलं तर तुमची शांती भंग झाल्याशिवाय राहणार नाही. एखाद्या वेळी जरी तुम्ही असत्य बोलला असाल तरीही तुम्हाला शांती आणि समाधान मिळणार नाही. मग तुम्ही म्हणाल की, सत्य बोलून नेहमी आमच्या वाटय़ात दु:खच येते. मग आम्ही काय करायचे. सत्य बोलून जर दु:ख येत असेल तर असत्य बोलून सुख मिळतेच असा काही जणांचा समज आहे. पण तो साफ चुकीचा आहे.

कारण असत्य हे नेहमी मनुष्याची दिशा भरकटवण्याचे काम करत असते. त्यामुळे महाराज म्हणतात, कधीच असत्य बोलू नका. मग लोक असा प्रश्न विचारतील की, जर महाराज एवढं सगळं करून देखील सुख मिळत नाही मग नेमकं सुख कशात मिळेल तर त्याचंही उत्तर महाराजांनी याच अभंगाच्या शेवटच्या चरणात दिलं आहे. महाराज म्हणतात, मनुष्याला जे जमत नाही त्यातच त्याचं सुख आहे. उदाहरण द्यायचं झालं तर मूर्खाला अज्ञानातच सुख मिळतं. मनुष्याला स्वत:च्या कोणत्याच वस्तूचा किंवा स्वत:चा त्याग करता येत नाही.

त्यामुळे त्याला सुख मिळूच शकत नाही. कारण त्यागातच खरे सुख आहे, असं महाराज म्हणतात. पण तुम्ही म्हणाल त्याग केल्यावर आम्ही पुढे काय करायचं, नुसतं त्यागात सुख आहे का? तर नाही त्याग केल्यानंतर आपण ज्ञानाच्या रंगात रंगलो पाहिजे. म्हणजेच आपण नामस्मरण केलं पाहिजे. त्या नामातच सुख आहे, असं महाराज सांगतात. जेव्हा आपण सर्व गोष्टीचा त्याग करतो तेव्हा आपलं असं काहीच राहत नाही. नुसतं नाम घेतलं तर आपल्या विषय वासना दूर पळून जातात. देहाचा अभिमान सोडून जातो आणि लाज मरून जाते. तुमच्या ज्या वासना विषयाच्या अपेक्षा आहेत, त्या भगवंताच्या चरणी अर्पण करा. म्हणजेच तुम्हाला ब्रह्मज्ञानाचं सुख मिळाल्याशिवाय राहणार नाही, असे ते ठोसपणे एका अभंगात लिहितात.

**। मन रंगले हरिनामी। बंद**
**झाल्या विषयवृंदी।**
**। गेला देहाचा अभिमान। लाज**
**पळाली सोडून।**
**। पुरवी अनंत वासना। घाली**
**हरिच्या चरणा।**
**। तुकडय़ा म्हणे ऐसे होता।**
**ब्रह्मज्ञान येई हाता।**

**- अमोल उंबरकर**

# सुधीर फडके यांचे जीवनचरित्र आता पडद्यावर साकारणार

**स्वातंत्र्यपूर्व** ते स्वातंत्र्योत्तर कालखंडात पाच दशके संगीताच्या माध्यमातून रसिकांच्या मनाला भूरळ घालणाऱ्या सुधीर फडके यांचे भारतीय चित्रपटसृष्टीत मोलाचे योगदान लाभलेले आहे. एकीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघात कार्यरत असताना चित्रपटसृष्टीत गायक, संगीतकार आणि निर्माता म्हणून कारकीर्द गाजवलेल्या बाबुजी अर्थात सुधीर फडके यांच्या जीवनावर आधारित चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. त्यानिमित्ताने...



प्रभु श्रीरामाचा महिमा गीत – संगीताच्या माध्यमातून आविष्कृत करणाऱ्या ' गीत रामायण ' व्दारे गायक आणि संगीतकार म्हणून बाबुजी अर्थात सुधीर फडके हे नाव घराघरात पोहोचलेले आहे. प्रतिभाशाली संगीतकार आणि अवीट गोडीच्या गायनकलेने रसिकांच्या मनाला भूरळ घालणाऱ्या सुधीरजींचे चित्रपट संगीतक्षेत्रात मोलाचे योगदान आहे. रसिकांची अभिरुची संपन्न करण्यात ज्या गायक , संगीतकारांनी प्रमुख भूमिका बजावली त्यामध्ये सुधीरजींचे नाव आवर्जून घेतले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेल्या या कलावंताने जवळपास पाच दशके मराठी – हिंदी चित्रपटसृष्टीत गायक , संगीतकार आणि निर्माता म्हणून आपल्या व्यक्तीमत्त्वाचा स्वतंत्र ठसा उमटविलेला आहे. आपल्या कारकीर्दीत त्यांनी शंभराहून अधिक चित्रपटांना संगीत दिलेले आहे. मराठीतील ख्यातनाम कवी आणि गीतकार ग. दि. माडगुळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले ५६ गीतांचा समावेश असलेले ' गीतरामायण ' सुधीरजींच्या सांगितिक कारकिर्दीतील एक ' मानाचे पान ' म्हणून ओळखले जाते. राष्ट्रपती पदकासह अनेक मान, सन्मान आणि पुरस्कार प्राप्त केलेल्या अशा या महान कलावंतांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची निर्मिती होत आहे. ' स्वरगंधर्व – सुधीर फडके ' हे त्या चित्रपटाचे शिर्षक आहे. रिडीफाईन प्रॉडक्शनच्या बॅनरखाली झळकत असलेल्या या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन या बाजू योगेश देशपांडे यांनी सांभाळल्या आहेत. याव्यतिरिक्त सौरभ गाडगीळ यांच्यासोबत चित्रपटाच्या निर्मितीमध्येही योगेश यांचा सहभाग आहे. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर प्रदर्शित होत असलेल्या या चित्रपटात सुनील बर्वे, शरद पोंक्षे, अविनाश नारकर, मृण्मयी देशपांडे, अपुर्वा मोडक, सागर तळाशीकर, आदिश वैद्य या कलावंतांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# जैन सोशल संगीनी ग्रुपतर्फे ३५ उद्योगिनी महिलांचा सन्मान समारोह संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – जैन सोशल ग्रुप संगीनी तर्फे सामाजिक उपकम राबविले जातात याच अंतर्गत महिला दिवसाचे औचित्य साधुन ज्या संगीनी आपला व्यवसाय करतात त्यांचा सन्मान समारोहाचे आयोजन मराठवाडा महसुल प्रशिक्षण प्रबोधीनी येथे आयोजीत करण्यात आला होता.

यामध्ये ११ प्रकारचा व्यवसाय यामध्ये बुटीक, साडी, इंजिनियर, सी.ए टॅक्स, डान्स कोरिओ ग्राफी, अन्न प्रकिया, गिप्ट पॅकींग, क्लासेस, स्टेशनरी, इंमिटेशन ज्वेलरी, शिक्षक, फिटनेस वेट लॉस आदी उदयोगीनीचा सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सीमाजी झांबड हया होत्या तसेच जैन सोशल ग्रुप चो पीआरओ सुनिल सिसोदीया, महाराष्ट्र संगीनी चेअरमन पर्सन सुवर्णा सिसोदीया यांनी यावेळी महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी जे.एस.जी चे अध्यक्ष राकेश बड़जातिया, सेक्रेटरी लक्ष्मीकांत जैन यांची उपस्थिती होती. कार्यकमाचे आयोजन व नियोजन संगीनीच्या अध्यक्षा लता जैन यांनी केले.

तर सुत्रसंचालन सोनीका देवडा, निता सेठीया, खुशी कोठारी यांनी केले. तर जयश्री गुजरानी, रश्मी शहा, रुपाली फुरसुले, वंदना संचेती, लता मंडलेचा, रिना बडजाते, रिना जैन, सुमन गंगवाल, सिमा मुथा यांचे सहकार्य लाभले. तर आभार प्रदर्शन सचिव शिल्पा बोथरा यांनी मानले.

# संत मुक्ताईचे आनंदमय ज्ञानतेज

**ताटी उघडा ज्ञानेश्वरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥**

आजच्या विज्ञान युगातही आपणाला अंधश्रद्धा व अज्ञान बऱ्याच प्रमाणात पाहायला मिळते केवळ अज्ञानी किंवा अडाणी लोकस अंधश्रद्धा बाळगतात असे नाही तर सुशिक्षितही अंधश्रद्धा बाळगत असल्याचे आपण पाहतो आज जर ही परिस्थिती आहे तर सुमारे सव्वा सातशे वर्षांपूर्वी अंधश्रद्धा आणि अज्ञान किती बळकट असेल याची आपल्याला कल्पना येऊ शकेल अशा कठीण परिस्थितीमध्ये स्वतःला स्वतः शिवाय आधार नसलेल्या निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई या भावंडांनी समाजाची अंधश्रद्धात्मक कोंडी फोडण्यासाठी केलेला प्रत्येक प्रयत्न उपदेश शब्दात सांगणे तसे कठीण आहे असे असले तरी हे सत्यच आहे की या भावंडांनी समाजाला अज्ञान विषमता अन्याय अंधश्रद्धा आदींच्या विषयी परिस्थितीतून बाहेर काढण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे या चार भावंडांपैकी आपण मुक्ताईने जो प्रयत्न केला आहे तो प्रयत्न आणि मुक्ताईंनी त्यांच्या वाणीतून केलेला उपदेश संत मुक्तांचे आनंदमय ज्ञान तेज या पुस्तकातून पाहत आहोत मुक्ताईने निवृत्ती ज्ञानदेव सोपान देवाप्रमाणे विविध प्रकारचे अभंग लिहिले आहेत या विविध प्रकारात पंढरी महात्म्य नामपर अभंग संतपर अभंग उद्देश पर अभंग ताटीचे अभंग तसेच मुक्ताई चांगदेव संवाद वर अभंगांचा समावेश आहे मुक्ताईच्या या विविध अभंगातील ताटी पर असलेले अभंग वारकरी संप्रदायात जास्त सुपरीचीत असल्याचे दिसून येते. ज्ञानेश्वरी सारखा महान ग्रंथ लिहिणाऱ्या श्री ज्ञानदेवांना प्रसंगानुरूप भावनिक मार्गदर्शन करून विश्वाच्या कल्याणासाठी प्रवृत्त करण्याचे महान कार्य मुक्ताईने ताटीच्या अभंगातून केल्याने मुक्ताईची महानता वारकऱ्यांच्या हृदयात स्थान निर्माण करून बसली आहे समाजाने केलेले आर्थिक भावनिक सामाजिक मानसी व शारीरिक गाव सहन न झाल्याने उद्विग्न होऊन झोपडीचे दार बंद करून नको हे जीवन या मानसिकेत बसलेल्या आपल्या वडील बंधूला ताटी उघडा ज्ञानेश्वरा ताटी उघडा ज्ञानेश्वरा या भावनिक हाकेतून ज्ञान व कर्तव्य आणि जबाबदारीचा मार्ग दाखवत ज्ञानदेवांना झोपडीचे दार उघडायला भाग पाडलेल्या मुक्ताईच्या शब्दांना अनुभवण्याची संधी मुक्ताई आईसाहेबांच्या व श्री ज्ञानदेवांच्या कृपेने पुस्तक रूपाने आपणाला मुक्ताईचे आनंदमय ज्ञानेश या पुस्तकातून उपलब्ध झाली आहे हे खरोखरच आमचे भाग्य आहे निवृत्ती ज्ञानदेव व सोपान देवाप्रमाणे प्रत्येक बंधूंनी आपल्या भगिनीला मुक्ताईसारखा ळळा लावला तिचा आदर केला तसेच प्रत्येक भगिनीने मुक्ताई प्रमाणे आपल्या भावंडावर जीवापाड निस्वार्थ प्रेम केले तर समाजातील भावाभावातील बहीण भावातील बहिणी बहिणीतील वादविवादाचे चित्र नष्ट होऊन केवळ आनंदच आनंद अनुभवायला मिळेल असे आम्हास वाटते आपल्या सर्वांच्या आनंदात भर पडण्यासाठीच हे लेखन आहे असे आमचे मत आहे या लेखनाचा सहवास आपणास आनंदाची अनुभूती देवो अशी श्री ज्ञानदेव भगिनी संत मुक्ताई चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी जय मुक्ताई ।



**– ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**

# वैजापूरात शहीद दिवसानिमित्त जेष्ठ नागरिकांनी केले शहीदाना अभिवादन



वैजापूर, दि. २६ (प्रतिनिधी) – शहीद दिन निमित्त वैजापूरात शनिवार(ता,२३)रोजी परमवीर चक्र विजेता शहीद अब्दुल हमीद एकता असोसिएशन व शिवराणा विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आज १९व्या वर्षी सुद्धा 'शहीद दिन' निमित्त येथील ठक्कर बाजारच्या मैदानावर शहीद भगतसिंग, शहीद राजगुरू व सुखदेवसिंग यांच्या प्रतिमाना प्रथम शहरातील जेष्ठ नागरिक दलित मित्रपो डॉ.व्ही. शिंदे, पोलीस पाटील गुलाबराव साळुंके, शिवदत्त सिह उर्फ राजेंद्रसिह राजपूत, सामाजिक कार्यकर्ते व वैजिनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघचे उपाध्यक्ष रवींद्र साखरे, सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांनी,राजू पठाण यांनी पुष्पचक्र व पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर आ. रमेश बोरनारे, माजी आ. भाऊसाहेब पा, चिकटगावकर, डॉ. दिनेश परदेशी, बाळासाहेब संचेती, विशाल संचेती, बाबासाहेब जगताप, राजेंद्र पा.साळुंके, डॉ.संतोष गंगवाल, सतपालसिंग राजपूत, पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे, चंद्रपालसिंग राजपूत, सेंट मोनिका शाळेचे प्राचार्य किशोर साळुंके व त्यांचे एन.सी.सी. छात्र यांच्यासह शहरतील विविध स्तरावरील नागरिक पुरूष व महिला उपस्थित होते. सूत्र संचलन धोंडीराम राजपूत यांनी केले आभार सतपाल राजपूत यांनी मानले.

# धुलीवंदन: दारूच्या नशेत पत्नीसह दोन मुलींना घरात कोंडून घर पेटवले; तिघींचा मृत्यू

अहमदनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – दारूच्या नशेत पतीने पत्नीसह दोन मुलींना घरात कोंडून घर पेटवल्याची खळबळजनक घटना पिंपळगाव लांडगा येथे घडली. या दुर्घटनेत तिघींचाही होरपळून मृत्यू झाला.

सुनील लांडगे असे आरोपी पतीचे नाव असून त्याने आपली पत्नी लीला आणि दोन मुलींना घरात कोंडले. त्यानंतर बाहेरून कुलूप लावून घरामध्ये पेट्रोल टाकत आग लावून पत्नी आणि दोन मुलींना जाळून मारले आहे. हा सर्व प्रकार सुनील याने पत्नीच्या अनैतिक संबंधाच्या संशयावरून केल्याची माहिती समोर आली आहे. आग लागल्याची माहिती मिळताच ग्रामस्थांनी आग विझवण्यासाठी सुनील याच्या घराकडे धाव घेतली. मात्र घराला कुलूप लावलेले असल्यामुळे त्यांना काही मदत करता आली नाही आणि घरामध्ये कोंडून टाकलेल्या पत्नी आणि मुलींचा जागीच होरपळून मृत्यू झाला.

दरम्यान, नगर तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी आरोपी सुनील लांडगे याला ताब्यात घेतलं आहे. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या सुनील याने केलेल्या कृत्याची लगेचच पोलिसांना कबुली दिली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहे.

# येवला राजपूत/परदेशी समाजाच्या वतीने शासन पुरस्कारार्थी धोंडीरामसिंह राजपूत यांचा सत्कार



वैजापूर, दि. २६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र शासनाने सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांना अनुक्रमे राज्यातून एकमेव दिला जाणारा पुरस्कार पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड व दुसरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व समाज कल्याण मंत्री संजय बनसोड यांच्या हस्ते देऊन राजपूत यांच्या सामाजिक कार्याची दखल घेतली यास्तव येवला येथील समस्त राजपूत/परदेशी समाजाच्या वतीने शुक्रवार(ता.२२)रोजी बुंदेलपुरा येथील श्री महादेव मंदिर परिसरात जमलेल्या पुरुष व महिला यांच्या उपस्थिती भव्य सत्कार करून अभिनंदन केले. या प्रसंगी सेवा निवृत्त पोलीस अधिकारी प्रकाशसिंग राजपूत, जेष्ठ नागरिक विठ्ठलसिंग राजपूत, धिरजसिंह राजपूत, अक्षय राजपूत, प्रेम राजपूत, सौ. सुषमा राजपूत. प्रीती राजपूत, रुपाली राजपूत, यांच्यासह शहरातील सर्व थरातील नागरिक बंधू-भगिनी उपस्थित होते.

# वैजापूरात होळी व धुलिवंदन दिनी शासन पुरस्कार्थी धोंडीराम राजपूत यांचा पत्रकार, समाज कार्यकर्ते, अधिकारी यानी केला सत्कार व अभिनंदन



वैजापूर, दि. २६ (प्रतिनिधी) – होळी व धुलिवंदन दिनाचे औचित्य साधत रविवार(ता.२४)रोजी येथील पाटील गल्ली मित्र मंडळ, पत्रकारमंडळ, अधिकारी यांनी राज्य शासनाचे दोन पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्ते, जेष्ठ साहित्यीक, जलदुत, स्वच्छतादूत म्हणून कार्यरत धोंडीरामसिंह राजपूत यांचा पाटील गल्लीतील मारोती मंदिरात सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. जेष्ठ पत्रकार व संपादक घनश्याम वाणी, एल आय, सी अधिकारी सी.के.पवार, वसुली अधिकारी ज्ञानेश्वर अनर्थे, सेवा निवृत्त मंडळ अधिकारी अशोक आप्पा पवार खंडाळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी बाळासाहेब वाणी, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब गावडे, राजेंद्र पा. साळुंके, अशोक अण्णा चव्हाण, यांनी राजपूत यांना शाल, श्रीफळ, बुके,व हार देऊन सत्कार केला व अभिनंदन केले.

# लष्करातील जवानांनीही केला राजपूत यांचा सत्कार

वैजापूर, दि. २६ (प्रतिनिधी) – अ.भा. सीआरपीएफ चे सेवा निवृत्त सेक्रेटरी फौजी गौतम अशोक गायकवाड,बी,एस, एफ,चे अध्यक्ष फौजी सोपानराव गाढे, सद्या जम्मू –काश्मीर येथे कार्यरत असलेले सी.आर.पी.एफ.चे जवान संतोष साठे या जवानांनी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी एकत्र येत राज्य शासनाने दोन पुरस्कार देऊन सन्मानित केलेले सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांचा नुकताच सन्मान करून त्यांचे अभिनंदन केले या प्रसंगी अध्यक्ष स्थानी स्वातंत्र्य सैनिक कै, दशरथ नाना गायकवाड यांचे उत्तराधिकारी अशोक दशरथ गायकवाड होते, या विद्यार्थ्यांना राजपूत यांनी लष्करी सेवेत सहभागी होऊन देशसेवा करण्यासाठी प्रवृत्त केले होते, हे सर्व लष्करी जवान राजपूत यांचे विद्यार्थी आहेत.



# आचार्य सुविधि सागरजी महाराज यांचा ५४ वा अवतरण दिवस उत्साहात साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – प.पु.सन्मतीसागरजी महाराज यांच्या उपवनातील सुगंधीत पुष्प आचार्य सुविधि सागरजी महाराज यांचा ५४ वा अवतरण दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्व प्रथम सकाळी भगवातांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. तदनंतर आचार्यश्रीच्या अवतरण दिवसाचे औचित्य साधून १ वर्ष ते १५ वर्षा पर्यतच्या मुला मुलींना मोफत सुवर्ण प्राशन आर्शिर्वाद आयुर्वेदिक यांच्या विद्यमाने करण्यात आले. यामध्ये १३५ मुला मुलींचा सहभाग होता सर्व प्रथम कार्यकमाची सुरवात सपना पापडीवाल यांच्या मंगला चरणाने करण्यात आली.

तसेच यावेळी विनोद दिलीप सेठी परिवारातर्फे सिध्दचक महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यकमाचे दिप प्रज्वलन चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट कार्यकारणी हडकोचे अध्यक्ष कैलास कासलीवाल, अशोक अजमेरा, मुकेश पाटणी, दिलीप सेठी, पंकज छाबडा, निलेश बडजाते, योगेश ठोले, राहुल कासलीवाल, नितेश कासलीवाल, सिमा चुडीवाल, मंजु पाटणी, मिना पापडीवाल, सागर लोहाडे, सुमित बाकलीवाल, राकेश कासलीवाल, विलास कासलीवाल, विजया सेठी, भरत पापडीवाल, शामल कासलीवाल, संतोष पापडीवाल शिवानी निखिल लोहाडे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी सुविधीसागरजी महाराज यांच्या जीवनावर राजाबजार पंचायत चे सचिव अशोक अजमेरा यांनी आपले मनोगत व्यक्त करुण सम्पूर्ण जैन समाज तर्फ विनयांजलि दिली. कार्यकमाचे आभार प्रदर्शन विनोद सेठी यांनी केले. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून
दैनिक लोकविजय कार्यालय,
३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# वैजापुरात व्यसन व विकारांची होळी थोर समाज सुधारक फुले पुतळ्यासमोर पेटविण्यात आली



वैजापूर, दि. २६ (प्रतिनिधी)– येथील महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्यासमोर शहरातील सामाजिक विचारांचे कार्यकर्ते सालाबादप्रमाणे याही वर्षी रविवार (ता,२४)रोजीएकत्र आले,व व्यसन व विकारांची होळी ज्यात विडी, काडी, सिगारेट ची अर्धवट जळलेली थोटके, भिंगरी दारूचे खोके व सिगारेटचे रिकामे पाकीट, तंबाखू व चुन्याच्या पुडया व ईतर व्यसन साधने व मानवी विकार काम, क्रोध, मोह, माया, मत्सर, जुन्या रूढी, अंधश्रद्धाचे धागे दोरे, काळी बाहुली, लिंबू, मिरची ची होळी पेटविण्यात आली. नुकतेच शासनाने दोन पुरस्कार देऊन सन्मानित केलेले सामाजीक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते या विकार व व्यसनांच्या वस्तूंची होळी पेटविण्यात आली,प्रथम राजपूत यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

या समयी घोषणा 'व्यसनाची होळी करू या निरोगी जिवन जगू या'नको विडी नको सिगारेट –होळीत जाळू यांना थेट 'विकार मुक्त जगू या –निरोगी आपण राहू या'अशा घोषणा देत होळी पेटविली.

फुले, शाहू, आंबेडकर जयंती उत्सव विचारमंच व अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांनी आयोजित या कार्यक्रमात अ, भा, समता परिषदेचे जगन गायकवाड, नाभिक महामंडळ चे दिलीप अनर्थे, ज्ञानेश्वर घोडके, प्रमोद पठारे, अण्णासाहेब ठेंगडे, धीरजसिंग राजपूत, अशोक देवकर, श्री, विश्वासू, श्री. बागुल, दिलीप पठारे, इलियास शहा, राधेश्याम जगताप यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाटील गल्लीत मानाच्या होळीची पूजा उल्हास साळुंके, लिमेश वाणी यांनी केली.

या प्रसंगी ,वसंतराव साळुंके, उत्तमराव साळुंके,जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, धोंडीराम राजपूत,राजेंद्र पा. साळुंके, हे उपस्थित होते.

# एमजीएममध्ये मतदार जनजागृती

## विद्यार्थ्यांनो मतदान करा; जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- संपूर्ण जगामध्ये भारतीय लोकशाहीची महान व यशस्वी लोकशाही म्हणून ओळख आहे. ही लोकशाहीतील महत्त्वाचा भाग म्हणजे मतदान करणे. मतदान करणे हे आपल्या सर्वांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. लोकशाही बळकट आणि सुदृढ करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.



लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ संदर्भात जनजागृती करण्यासाठी जिल्हा निवडणूक कक्ष आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वीप' ('सिस्टिमॅटिक वोटर्स एज्युकेशन अँड इलेक्टोरल पार्टीसिपेशन प्रोग्रॅम') उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, उपजिल्हाधिकारी चेतन गिरासे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. आर. आर. देशमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, मतदानाची टक्केवारी कमी होत असून ती वाढवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून आपल्या आजूबाजूच्या लोकांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहन देत त्यांना या प्रक्रियेत सामील करून घेण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. 'ग्रेटर पार्टीसिपेशन फॉर स्ट्रॉन्गर डेमोक्रसी' ही यंदाची थीम निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आणखीही आपली नावनोंदणी केलेली नाही त्यांनी ती तात्काळ करून घ्यावी. अगोदरच्या पेक्षा आता मतदान करण्याची प्रक्रिया सोपी झाली आहे. मतदान करण्यासाठी मतदानाच्या दिवशी निवडणूक आयोग सुट्टी जाहीर करते. निवडणूक आयोगाकडून मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पाणी, वैद्यकीय सुविधा, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेष सुविधा, पाळणा घर आदींसह इतर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. विलास सपकाळ म्हणाले, निवडणूक प्रक्रियेसाठी खूप मोठी यंत्रणा देशभरात राबवली जाते. मतदान करणे हा आपला अधिकार आहे. मतदानादिवशी विद्यापीठ कोणतीही परीक्षा आयोजित करीत नाही. सर्वांकडे मतदान ओळखपत्र असणे आवश्यक आहे. मतदान ओळखपत्र ही आपली स्वत:ची ओळख असते. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते.

# मतमोजणी केंद्रात सर्व आवश्यक सुविधांची सज्जता करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- औरंगाबाद लोकसभा मतदार संघाचे नियोजित मतमोजणी केंद्र असलेल्या इमारतीची आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी पाहणी केली.मतमोजणी केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निकषांप्रमाणे सर्व आवश्यक सुविधांची सज्जता करा, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

मतमोजणी केंद्राच्या पाहणीच्या वेळेस पोलीस आयुक्त मनोज लोहिया.पोलीस अधीक्षक (ग्रामीण) मनीष कलवानिया. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरेकर, सातारा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री गिरी,यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते. तेथेच आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी स्वामी यांनी मतमोजणी केंद्रासंदर्भात आढावा घेतला.

आढावा बैठकीत त्यांनी निर्देश दिले की, मतमोजणी केंद्रावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच आपत्ती व्यवस्थापन, पुरेशा प्रमाणात वीज पुरवठा व पर्यायी जनरेटर, इंटरनेट याची व्यवस्था करण्यात यावी. मतमोजणी केंद्राच्या परिसरामध्ये प्रवेश करणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना ओळखपत्राचे वाटप करण्यात येणार यावे. मतमोजणी केंद्र आणि परिसर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व सुविधांनी सज्ज करावे. सुविधा उभारणी दि.११ मे पर्यंत पूर्ण करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

उपस्थित सर्व अधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी मतमोजणी केंद्रावरील विविध कक्षासाठी जागेची पाहणी केली. मीडिया कक्ष, निकाल ऐकायला जमणाऱ्या लोकांना नेमून दिलेल्या जागा उपलब्धतेबाबत पाहणी यावेळी केली. ऊन, अवकाळी पाऊस इ. हवामानासंदर्भातील शक्यतांच्या अनुषंगाने सर्व तयारी प्रशासनाने करून मतमोजणी केंद्र सर्व सुविधा सज्ज करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# 'पाच वरीस त्यांचे, एक दिवस आपुला' प्रलोभनांना बळी पडू नका; पथनाट्याद्वारे प्रबोधन

## मतदार राजा जागा हो; पथनाट्याला उदंड प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- देशात सार्वत्रिक निवडणुका सुरू होत आहेत.त्यानिमित्त निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मतदान जनजागृती करण्यासाठी मा.आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत आणि जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या निर्देशानुसार शहरात विविध ठिकाणी मतदान जागृती कार्यक्रम सुरू आहे.




याच अनुषंगाने म.न.पा. केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय हर्सूलगाव शाळेतील विद्यार्थी हे ' मतदारा जागा हो ' हे पथनाट्य सादर करीत आहे . मतदार नोंदणी अधिकारी राठोड, तहसीलदार शिवानंद बिडवे , उपायुक्त अंकुश पांढरे तसेच शिक्षणाधिकारी भारत तिनगोटे आणि केंद्रीय मुख्याध्यापिका उर्मिला लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या पथनाट्याला प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. 'पाच वर्ष त्यांचे आणि एक दिवस आपुला' अशाप्रकारे आपले मतदान विकू नका, 'बोटाने आपले भविष्य घडवा, ' मतदार हा लोकशाहीतील राजा आहे, ' प्रलोभनाला बळी पडू नका 'असे अनेक संवाद नागरिकांना आवडत आहे .

या पथनाट्यात आर्यन राजगुरे, अदिल पटेल,सोफियान सय्यद ,साईराज सहाने,उबेद शेख, सुयश ढगे,दर्शना तुपे, रेणुका वाघ,सृष्टी गौतम,हर्षदा कांबळे, भारती गायकवाड आणि यशोदा खेत्रे या विद्यार्थ्यांनी भूमिका केल्या आहेत. पथनाट्याची संकल्पना,लेखन आणि दिग्दर्शन हर्सूल शाळेतील शिक्षक संजय कुलकर्णी यांनी केले आहे. मतदान ब्लॉक लेव्हल ऑफिसर महालकर अंकुश लाडके,संजय कुलकर्णी ,रमेश वाडेकर, हिरेकर, संजय मोकळे , विशाल बाविस्कर, कासलीवाल आदी शिक्षक याचे नियोजन करीत आहेत.

## विभागीय भांडारे २७ ते ३१ मार्च या कालावधीत बंद

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- पाठ्यपुस्तक मंडळाकडे नोंदणीकृती असलेल्या सर्व मुद्रक, बांधणीकार व पुस्तक विक्रेते तसेच शैक्षणिक संस्था यांची २७ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत पुस्तके, कागदाची भांडार स्तरावर वार्षिक प्रत्यक्ष साठा मोजणी होणार आहे.

वार्षिक प्रत्यक्ष साठा मोजणी कालावधीत पाठ्यपुस्तक मंडळाची गोरेगाव, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नाशिक, कोल्हापूर, पनवेल व अमरावती येथील विभागीय भांडारे यांची सर्व व्यवहार (आवक- जावक विक्री इत्यादी) बंद राहतील, असे छत्रपती संभाजीनगरच्या पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र प्रभारी भांडार व्यवस्थापक एस. एम. पवार यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# आरोग्य कर्मचाऱ्यांनी ग्रामिण भागात मतदार जागृती करावी-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- ग्रामिण भागात आरोग्य विभागाचे कर्मचारी मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. शिवाय त्यांचे ग्रामिण भागातील लोकांशी चांगला संवाद असतो. तो धागा पकडून आरोग्य कर्मचाऱ्यांनी ग्रामिण भागातील मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करावी,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

संत एकनाथ रंगमंदिर येथे वैद्यकीय अधिकारी यांच्या आढावा बैठकीत त्यांनी हे आवाहन केले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद डॉ.दयानंद मोतीपोवळे ,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर वैद्यकीय अधिकारी. पारस मंडलेचा, उपजिल्हाधिकारी. रामदास दौड, उपजिल्हाधिकारी अर्चना खोतमाळीस, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद श्री भोकरे. अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, पर्यवेक्षिका यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतीय लोकशाहीचा उल्लेख केला जातो, या लोकशाहीला मजबूत व प्रगल्भ करण्यासाठी प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. आरोग्य विभाग हा अधिकारी कर्मचाऱ्यांची मोठी संख्या असलेला विभाग असून ग्रामीण भागापर्यंत सेवा देणारा आहे. त्यामुळे मतदानाच्या प्रक्रियेमध्ये मतदारांमध्ये जाणीव जागृती करण्याचे काम आरोग्य कर्मचाऱ्यांनी करावे. मतदान केंद्रावर आरोग्याच्या सुविधा, त्याचप्रमाणे लहान मुलांच्या सांभाळासाठी पाळणाघरांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, याची माहिती मतदारांना विशेषतः महिला मतदारांना द्या. महिला मतदारांची संख्या ५० टक्के आहे. महिलांच्या मतदान जाणीव जागृतीत महिला वैद्यकीय अधिकारी , पर्यवेक्षिका अंगणवाडी सेविका यांनी सक्रिय सहभाग घेऊन आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे असे आवाहन करण्यात आले.

ग्रामीण भागातील बँकसखी, वेगवेगळे व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून महिलांना मतदार जागृतीच्या उपक्रमाची माहिती उपलब्ध करुन द्यावी. मतदार जागृती मध्ये स्वतः सहभाग घ्यावा. नकारात्मकता दूर करून आपल्या कुटुंबातील तसेच आपण कामाच्या ठिकाणी , नातेवाईक, कुटुंब येथे मतदानाला प्रोत्साहन देण्यात यावे. दिव्यांग आणि वृद्ध तसेच लहान मुलांना सोबत घेऊन येणाऱ्या महिला मतदारांनाही आरोग्य विभागामार्फत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात जेणेकरून मतदान केंद्रावर अधिका अधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्यास सोयीस्कर होईल. प्रास्ताविक जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोती पोवळे यांनी तर आभार प्रदर्शन आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केले. बैठकीच्या सुरुवातीला एमजीएम कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर करुन मतदानाचे महत्त्व सांगितले.

# प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्या प्राधिकार पत्रांसाठीची शिफारस ४ एप्रिल पर्यंत आयोगाकडे पोहोचणे आवश्यक

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ च्या मतदान व मतमोजणीसाठी प्रसारमाध्यम प्रतिनिधींना द्यावयाच्या प्राधिकार पत्रांसाठीची निवडणूक आयोगाकडे शिफारस पोहोचण्यासाठी गुरुवार दि. ४ एप्रिल २०२४ अंतिम दिनांक देण्यात आला आहे. त्यापूर्वी ते जिल्हा माहिती कार्यालय, विभागीय माहिती कार्यालये, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अशा तीन पातळ्यांवरुन आयोगाकडे छाननी करुन आयोगाकडे पाठविले जाणार आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ च्या कामकाजाची पूर्वतयारी म्हणून निवडणूक भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. सदर कार्यक्रमानुसार महाराष्ट्र राज्यामधील लोकसभेच्या ४८ जागांकरिता ५ टप्प्यामध्ये मतदान होणार आहे.सदर निवडणूकीसाठी पहिल्या टप्प्याचे मतदान दिनांक १९ एप्रिल, २०२४ (शुक्रवार), दुसऱ्या टप्प्याचे मतदान दिनांक २६ एप्रिल, २०२४ (शुक्रवार), तिसऱ्या टप्प्याचे मतदान दिनांक ०७ मे, २०२४ (मंगळवार), चौथ्या टप्प्याचे मतदान दिनांक १३ मे, २०२४ (सोमवार) आणि पाचव्या टप्प्याचे मतदान दिनांक २० मे, २०२४ (सोमवार) रोजी होणार आहे. तसेच मतमोजणी दिनांक ०४ जून, २०२४ (मंगळवार) रोजी होणार आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदान / मतमोजणीचे वृत्तसंकलन / छायाचित्रण करण्याकरीता विविध प्रसिध्दी माध्यमांच्या प्रतिनिधींना भारत निवडणूक आयोगाची विहित प्राधिकारपत्रे प्रथम प्राप्त करणे आवश्यक आहे. अशी प्राधिकारपत्रे प्राप्त होण्याकरिता भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या इच्छूक प्रतिनिधींच्या नावांची शिफारस भारत निवडणूक आयोगाकडे पोहचण्याचा अंतिम दिनांक ०४ एप्रिल २०२४ असा आहे. या शिफारशी महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ०४ एप्रिल, २०२४ पर्यंत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर करावयाचा आहेत. प्रसिध्दी माध्यमांच्या ज्या प्रतिनिधींना वरील लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीकरिता प्राधिकारपत्रे हवी असतील अशा प्रतिनिधींनी आपली नावे, आपल्या पासपोर्ट आकाराच्या छायाचित्रासह २ प्रतीसह (मतदान/ मतमोजणी दोन्ही प्राधिकारपत्रे हवी असल्यास ३ प्रतीसह) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ०४ एप्रिल, २०२४ पर्यंत पाठवावीत. छायाचित्राशिवाय प्राप्त झालेली मागणी तसेच दिनांक ०४ एप्रिल, २०२४ नंतर या कार्यालयात प्राप्त झालेली मागणी स्वीकारण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी. महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

(पान १ वरुन)

## नागपूरातून काँग्रेसचे विकास ठाकरे...

यांनी आपण लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे काँग्रेसने नाना पटोले यांच्या ऐवजी आता विकास ठाकरे यांना उमेदवारी दिली आहे.

नागपूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेस प्रचंड बहुमताने विजय होईल, असा दावा विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. नागपूर हा काँग्रेसचा गड आहे. काही वर्षांसाठी येथे लोकांनी परिवर्तन केले होते. मात्र, यावेळी नागपूर हा काँग्रेसचा गड असून हा गड काँग्रेसच्या मागे प्रचंड ताकतीने उभा राहणार असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. हा विजय काँग्रेसच्या विजयामध्ये पहिल्या नंबरला असेल, असा मला विश्वास असल्याचेही ते म्हणाले. विकास ठाकरे हे किमान एक लाख मतांनी निवडून येतील असा विश्वास आपल्याला असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

## चंद्रपुरमधून भाजपचे मुनगंटीवार...

मात्र, आता पक्षाने उमेदवारी दिली असून पक्षाने दिलेले आदेश हे सर्वतोपरी मान्य करत सुधीर मुनगंटीवार यांनी देखील प्रचाराला जोरदार सुरुवात केली. त्यानुसार त्यांचा आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहे. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात २०१९ मधील मागील निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराने विजय मिळवला होता. सुरेश धानोरकर यांच्या रूपाने महाराष्ट्रात काँग्रेसचे एकमेव खासदार विजयी झाले होते. मात्र, त्यांचे निधन झाल्याने यावेळी काँग्रेसच्या वतीने त्यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर त्यांच्या विरोधात भारतीय जनता पक्षाने सुधीर मुनगंटीवार यांना मैदानात उतरवले आहे. त्यामुळे या वेळी चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची चर्चा राज्यात सर्वत्र दिसून येत आहे.

## मोदींचे २०४७ च्या विकसित भारताचे ध्येय मूर्खपणाचे

बनलेले असेल, असे ध्येय ठेवलेले आहे. याबद्दल प्रश्न विचारला असता रघुराम राजन म्हणाले की, हे ध्येय मूर्खपणाचे आहे. जर देशातल्या मुलांना माध्यमिक शिक्षण मिळत नसेल, अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यापासून वंचित राहत असतील, तर हे ध्येय गाठता येणार नाही. ''आपल्याकडे प्रचंड मनुष्यबळ आहे. पण या मनुष्यबळाच्या हाताला काम दिले नाही, तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे भारताला सर्वातआधी या मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करून त्यांना काम करण्यासाठी तयार करावे लागेल आणि त्यानंतर त्यांना रोजगारही उपलब्ध करून द्यावा लागेल'', असे रघुराम राजन यांनी स्पष्ट केले.

## राष्ट्रवादीचा पहिला उमेदवार जाहीर;...

ज्या जागा पाहिजे त्याबाबत भूमिका घेतली आणि त्याला इतर दोन पक्षांनी सहकार्य केले आहे. आमच्या मंत्र्यांवर एक लोकसभा आणि आमदार यांच्यावर विधानसभा जबाबदारी दिली आहे. आमचे उमेदवार मतदारसंघात नसेल तरी इतर मित्र पक्ष यांच्या सोबत प्रचार यंत्रणा राबवण्याचे निर्देश आहे. जाहीरनामा बाबत चर्चा करून काम सुरू आहे. आमचे पक्षाचे निवडणूक प्रमुख म्हणून याची जबाबदारी धनंजय मुंडे यांना दिली असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

## राजू शेट्टी यांचा यू टर्न; महाविकास आघाडीचा...

भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. मात्र, त्यानंतर लगेचच राजू शेट्टी यांनी आपण महाविकास आघाडीचा पाठिंबा घेण्यास तयार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र, पाठिंबा घेणार असलो म्हणजे आपण महाविकास आघाडीमध्ये सामील झालेलो नाही. आमचा पक्ष महाविकास आघाडीमध्ये येणार नाही. मात्र, आपल्याला पाठिंबा द्यावा, अशी भूमिका राजू शेट्टी यांनी घेतली आहे.

दैनिक लोकविजय **नावांत बदल**

**जुने नाव :** वृंदीका भागवत बिघोत राजपूत
**नविन नाव :** वृंदीका भागवत राजपूत
**पत्ता :** रा.शानुरवाडी, राजगुरु नगर, जि.छत्रपती संभाजीनगर

दैनिक लोकविजय **Change 0f Name**

**OLD NAME :- Vrandika Bhagwat Bighot Rajput**
**NEW NAME :- Vrandika Bhagwat Rajput**
**ADDRESS :- Shanurvadi, Rajgurunagar, Dist.Chhatrapati Sambhajinagar**

दैनिक लोकविजय **नावांत बदल**

जुने नाव : भागवत उत्तम बिघोत (राजपूत)
नविन नाव : भागवत उत्तम बिघोत

दैनिक लोकविजय **Change 0f Name**

**OLD NAME :- Bhagvat Uttam Bighot (Rajput)**
**NEW NAME :- Bhagvat Uttam Bighot**